# ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जि.पुणे

**ई - निविदा अंतर्गत खुली निविदा सूचना क्र.बी-०१/०१/२०२६-२७**

ग्रामपंचायत कुरुळी, तालुका खेड, जिल्हा पुणे यांचे तर्फे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार / उत्पादक / नोंदणीकृत औषध विक्रेते यांच्याकडून दोन पाकीट सिलबंध लिफाफा पद्धतीने खालील कामांच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फी रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | आवश्यक कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे कुरुळी, ता.खेड येथे ग्रामपंचायतीस जलशुद्धीकरण व आरोग्यविषयक साहित्य पुरवठा करणे. | ५९०/- | ५,०००/- | नोंदणीकृत पुरवठादार किंवा उत्पादक |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई - निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगनकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी, सूचना शुद्धीपत्रके इत्यादीची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) वरील कामांचे निविदा प्रपत्रे WWW. Mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती संकेतस्थळावरून दि.13/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजलेपासून ते दि.29/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अधिग्रहित(download) करता येईल

३) वरील कामांच्या निविदा WWW.Mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि.13/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजलेपासून ते दि.29/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अधिग्रहित (download) करता येईल व ऑनलाईन पद्धतीने सादर करता येतील.

४) निविदा फी व इसारा रक्कम ऑनलाईन पद्धतीने सादर करणेची आहे त्याशिवाय सदर निविदाधारकाची निविदा वैध धरली जाणार नाही.

५) सदर कामाच्या निविदेबाबत खालील बाबी आवश्यक राहतील.

लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा )

अ. प्रत्येक कामाचे निविदापत्र डाऊनलोड केल्याची फी व ईसारा रक्कम वरील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे Online e- Payment पध्दतीने ने भरावी व सदरची पावती स्कॅन करून अपलोड करावे लागेल.

आ. नोंदणी प्रमाणपत्र / शॉपअॅक्ट प्रमाणपत्राची प्रत स्कॅन करून अपलोड करावे लागेल.

इ. विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (Declaration) स्कॅन करून अपलोड करावे लागेल.

ई. प्राप्तीकर PAN CARD तसेच मागील ३ चालु आर्थिक वर्षाचे ITR स्कॅन करून अपलोड करावे लागेल. (A.Y.-2022-23, A.Y.-2023-24, A.Y.-2024-25)

उ. GST. Registration Certificate व ISO Cert. स्कॅन करून अपलोड करावे लागेल.

ऊ. PTRC CERT. (FORM I-A) व PTEC CERT.(FORM II-A) स्कॅन करून अपलोड करावे लागेल.

ऋ. सदर प्रकारच्या साहित्याचा याआधी कोणत्याही शासकीय संस्थेस पुरवठा केल्याचा अनुभव दाखला स्कॅन करून अपलोड करावा.

ऌ. भागीदारी संस्था असल्यास भागीदारी पत्र व आवश्यकतेनुसार पॉवर ऑफ अटर्नी जोडावी.

ऍ. शासन निर्णय सा.बा.विभाग सीएटी /२०१८ /प्र.क.१२७ /इ मा - २ नुसार विहित नमुन्यातील (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट -१) रक्कम रू.५०० च्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.

६) वरील (अ ते ए) कुठलेही कागदपत्रे सादर केलेले नसल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

७) निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

८) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा) दि.22/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता www.Mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जिल्हा पुणे येथे उघडण्यात येईल. तांत्रिक लिफापा क्र.१ मधील आवश्यक कागद पात्रांची सूची नसेल तर लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.

लिफाफा क्र.२ (व्यापारी लिफाफा)

अ. ई – निविदे सोबत जोडलेल्या BOQ File मध्ये निविदा धारकाचे नाव व दर नमूद असावा.

आ. निविदाधारकाने BOQ File मध्ये GST रक्कम स्वतंत्रपणे नमूद करावी.

९) मंजूर निविदा धारकाकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम कामाचा करारनामा करतेवेळी **"ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जिल्हा पुणे"** येथे देय असलेल्या एफ डी आर स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित रक्कम देयकातून कपात केली जाईल

१०) ग्रामपंचायत कार्यालयाकडून पुरवठा आदेश मिळाल्यानंतर आवश्यकतेनुसार मागणी केल्यावर त्वरित साहित्य पुरवठा करावा लागेल.

११) सदर साहित्याचा पुरवठा करताना आवश्यक ती सर्व बिले, प्रमाणपत्रे पुरवठादाराने ग्रामपंचायत कार्यालय कुरुळी येथे सादर करावयाची आहेत.

१२) पुरवठा करण्यात येणारे साहित्य हे आय एस आय ट्रेड मार्कचे असणे आवश्यक आहे.

१३) पुरवठा केलेल्या कुठल्याही साहित्यामधून ग्रामस्थांच्या आरोग्यास काही धोका निर्माण झाल्यास त्याची पूर्णता जबादारी हि ठेकेदाराची राहील व ठेकेदारावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१४) पुरवठा करण्यात येणारे साहित्य ठेकेदारास ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड जि.पुणे येथे पोहोच करून देणे बंधनकारक राहील.

१५) सदर कामाचा कालावधी हा एक वर्षाकरिता आहे. परंतु काही कारणास्तव सदर कालावधीमध्ये कमी करण्याचे अधिकार ग्रामपंचायत कुरुळी यांचेकडे राहतील.

१६) सदर साहित्याचा पुरवठा केल्यानंतर ग्रामपंचायतकडे निधी उपलब्ध नसल्यास निधी उपलब्धतेनुसार पुरवठादारास देयके अदा केले जातील.

१७) कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा हक्क ग्रामपंचायत कुरुळी यांनी राखून ठेवला आहे.

१८) पात्र निविदा धारकांच्या दराचा लिफाफा क्र.२ उघड्णेचा वेळ संबंधित पुरवठादारास ई-मे ल द्वारे. कळविला जाईल.

१९) निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर कागदपत्राच्या विधीग्राह्यतेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदरची बाब कायदेशीर / फ़ौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

२०) निविदा प्रक्रिया संपुर्ण संगणकीकृत असलेने ई-प्रणाली द्वारे निविदा उघडलेचा मेसेज ऑनलाईन येतो, सदरचा मेसेज पाहण्याची जबाबदारी निविदाधारकाची असुन त्याबाबत स्वतंत्र कोणताही पत्रव्यवहार अथवा भ्रमणध्वनीद्वारे कळविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२१) निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना, शुधीपत्रक अथवा इतर माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

२२) सदर निविदा प्रक्रियेमध्ये कायदेशीर वाद विवाद उपस्थित झाल्यास त्याबाबतचे कार्यक्षेत्र हे राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे न्यायालय राहील.

S.V. Sonawane

XXX

प्रशासक / ग्रामपंचायत अधिकारी

ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जि.पुणे

प्रशासक
ग्रामपंचायत कुरुळी

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कुरुळी
ता. खेड, जि. पुणे.

Signature Not Verified

Digitally signed by BALU BABAN MALGHE
Date: 2026.05.13 12:21:49 IST
Location: Maharashtra-MH